**सैनिकी शाळेतील विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,**

शासन निर्णय क्रमांक -संकीर्ण-२००२/प्र.क्र.३७१/मावक-३,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : ५ ऑगस्ट, २००३**

**प्रस्तावना:-** सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या व विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना **शासन निर्णय क्रमांक: ईबीसी-१०७४/५६४२३/डी-५, दिनांक ६ ऑगस्ट, १९७६ अन्वये निर्वाह भत्ता देण्याची योजना** लागू केलेली आहे व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर सदरहू योजना विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** याबाबत विचार करुन सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना, अनुसूचित जातीच्या व विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याच्या योजनेच्या धर्तीवर सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर निर्वाह भत्ता देण्यासाठी येणारा खर्च तातडीची गरज म्हणून आकस्मिकता निधीमधून अग्रिम म्हणून रु. ३,२३,४००/- (रुपये तीन लाख, तेवीस हजार चारशे फक्त ) शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक :- आकनि-११.०३/०४३/अर्थसंकल्प-५, दिनांक ४ ऑगस्ट, २००३ (संगणक संकेतांक क्रमांक: ८०००-०४३-५) अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात येत आहे. हा क्रमांक खर्चाच्या देयकावर तांबडया शाईने लिहून अधोरेखित करावा. याबाबतचे विवरणपत्र वित्त विभाग तसेच सह संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई यांना पाठवावे.

३. या बाबीवर होणारा खर्च " २२२५-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०३-मागासवर्गीयांचे कल्याण-२७७ शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (राज्य योजनांतर्गत योजना) (०२)(११) सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (२२२५-०८६-२) ४० शिष्यवृत्त्या/विद्यावेतने-मागणी क्रमांक : एन-४" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून प्रतिवर्षी करण्यात येणा-या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

४. यासाठी संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

कृ.मागे पहा.....

५.        हा शासन  निर्णय वित्त  विभागाच्या सहमतीने  त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: क्र.६१३/०३/ व्यय-१४,  दिनांक १६.७.२००३ अन्वये  निर्गमित  करण्यात येत  आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल  यांच्या  आदेशानुसार  व  नावाने



**(वै.अ.पारकर )**
**उप  सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र  राज्य, पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, म.रा,पुणे
संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
वित्त विभाग, (कार्यासन: व्यय १४/अर्थसंकल्प-३/५) मंत्रालय, मुंबई ३२
उपसंचालक, शिक्षण
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व  विभागीय  समाज  कल्याण  अधिकारी
सर्व  विशेष  जिल्हा  समाज कल्याण अधिकारी
सर्व  शिक्षणाधिकारी
त्यांना  कळविण्यात येते  की, सदर  शासन  निर्णयाची  प्रत सर्व शासन  मान्य सैनिकी शाळांना  त्यांनी त्यांच्या  स्तरावरुन  निर्गमित  करावी.
महालेखापाल,  महाराष्ट्र  - १/२  ( लेखा परीक्षा,  लेखा  अनुज्ञेयता), मुंबई  /  नागपूर
अधिदान  व  लेखाधिकारी,  मुंबई
सर्व  कोषागार  अधिकारी,  मुंबई
सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
निवड नस्ती ,  मावक  -३